बुधवार, दि १९ नोव्हेंबर २०२५ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक ११ वा ● किंमत २ रु. ● पाने ४

RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा

## १०१ शेतकऱ्यांना गहू-हरभरा बियाणे व खताचे वाटप; सेवाभावी संस्थांचा उदार उपक्रम

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले असताना, संकटलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी जालना जनसेवा ग्रुप आणि आनंदनगरी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांनी समाजोपयोगी पुढाकार घेतला आहे. रब्बी हंगामात पेरणीसाठी शेतकऱ्यांच्या हातात पुन्हा आशेची कणी देण्यासाठी आज दिनांक १९ नोव्हेंबर रोजी एकूण १०१ गरजू शेतकऱ्यांना गहू व हरभरा बियाण्याची प्रत्येकी एक गोणी आणि खताचे वाटप करण्यात येणार आहे.

गेल्या काही दिवसांत जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले. उभ्या पिकांवर पावसाने हाहाकार माजविल्याने अनेक शेतकरी रब्बी हंगामासाठी आवश्यक बियाणे आणि खत खरेदी करण्यासही असमर्थ होते. हीच परिस्थिती ओळखून जालना जनसेवा ग्रुप आणि आनंदनगरीतर्फे जिल्ह्यातील किमान १०१ शेतकरी बांधवांना मदतीचा हात देण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी शहरातील दानशूर नागरिकांकडे आवाहन करण्यात आले होते आणि या आवाहनाला अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




बियाणे व खत वाटपाचा कार्यक्रम आज सकाळी ११ वाजता, गणपती नेत्रालयाजवळील श्री दानकुंवर महाविद्यालय येथे मोठ्या मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. कार्यक्रमास माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, आमदार अर्जुनराव खोतकर, माजी आमदार कैलास गोरंट्याल, भाजप शहराध्यक्ष भास्कर दानवे, उद्योजक पन्नालाल बगडिया, आनंदनगरी संस्थेचे अध्यक्ष शिवरतन मुंदडा हे उपस्थित राहणार आहे. मान्यवरांच्या हस्ते शेतकऱ्यांच्या हाती नव्या हंगामाची साधने बियाणे व खत सुपूर्त करण्यात येणार आहे.

**शेतकऱ्यांसाठी मदतीचा हात - समाजातील ऐक्याचे उदाहरण**

जालना जनसेवा ग्रुपचे अध्यक्ष पुरुषोत्तम मोतीवाला, उपाध्यक्ष नरेश गुप्ता, सचिव डॉ. रामनारायण जैस्वाल, कोषाध्यक्ष गोवर्धन अग्रवाल, तसेच प्रकल्पप्रमुख गणेश अग्रवाल, संजय बाहेती व रवींद्र बांगड यांनी सर्व नागरिकांना कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

या उपक्रमामुळे अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून रब्बी हंगामाच्या पेरणीसाठी अत्यावश्यक मदत वेळेत मिळाल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटण्याची शक्यता आहे.

नागरी समाज, दानशूर व्यक्ती व सेवाभावी संस्था एकत्र आल्यास संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांचा किती मोठा आधार होऊ शकतो, याचे हे उत्तम उदाहरण. सरकारी मदतीच्या प्रतीक्षेत वेळ न दवडता समाजाने अशा प्रकारे पुढे येणे हा प्रशंसनीय व अनुकरणीय आदर्श आहे. पावसामुळे झालेल्या नुकसानीतून उभारी घेण्यासाठी हे बियाणे व खत शेतकऱ्यांच्या पेरणीला नवी ऊर्जा देईल.

# जेथलियांचा गिरवला स्वार्थी राजकारणाचा कित्ता ; निष्ठावंतांमध्ये नाराजीची लाट

## शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व वंचित बहुजन आघाडीसोबत नवी जुळवाजुळव

**परतूर । प्रतिनिधी -** राज्यातील नगरपरिषद निवडणूक अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिवस (दि. १७ नोव्हेंबर) अनेक राजकीय उलथापालथींनी गाजला. परतूर नगरपरिषद निवडणुकीतही काही अनपेक्षित घडामोडींमुळे येथे राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांनी महायुतीपासून दूर जात शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आणि वंचित बहुजन आघाडीसोबत हातमिळवणी केल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

**महायुतीऐवजी नवी आघाडी - निष्ठावंतांमध्ये संताप**

परतूरमध्ये महायुतीची संयुक्त लढत अपेक्षित असताना, जेथलिया यांनी त्यातून बाहेर पडत उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना व वंचितसोबत युती करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसमधील निष्ठावंत कार्यकर्त्यांचा ऐनवेळी उमेदवारीतून पत्ता कट झाला. त्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आणि संतापाचे वातावरण असून, अनेकांनी हे निष्ठावंतांवरील अन्याय असे मत व्यक्त केले.

**भाजपाची स्वतंत्र लढत : 'एकला चलो'चा नारा**

महायुतीतील धूसर परिस्थितीत भाजपाने स्वतंत्र लढत जाहीर केली आहे. भाजपाने शहरातील झालेल्या विकासकामांचा आधार घेत जिल्हा परिषदेचे माजी सभापती शहाजी राक्षे यांच्या कन्या - प्रियंका राक्षे - यांना नगराध्यक्ष पदाची उमेदवारी जाहीर केली आहे.

**जेथलिया गटाचा उमेदवार**

जेथलिया यांनी शिवसेना (उ.ठा.) व वंचितचा पाठींबा घेत माजी नगरसेवक बाबुराव हिवाळे यांच्या पत्नी यांना उमेदवार म्हणून मैदानात उतरवले आहे.

काँग्रेस-राष्ट्रवादी (शरद पवार) आघाडीचा उमेदवार काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांनी प्रतिभा सिद्धार्थ बंड यांना उमेदवारी दिली आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे परतूरमध्ये तिरंगी लढत अधिक चुरशीची होण्याचे संकेत मिळत आहेत.

**'निष्ठावंतांना दुर्लक्ष' - राजकीय प्रश्न पुन्हा हवा**

गेल्या अनेक वर्षांपासून परतूर नगरपरिषदेत सत्ता राखणाऱ्या जेथलिया गटावर खोटी आश्वासने व स्वार्थी राजकारण अशा आरोपांची चर्चा वर्षानुवर्षे होत आली आहे. या वेळीदेखील ऐनवेळी 'आयात उमेदवार' देत निष्ठावंतांना दुय्यम स्थान दिल्याचा आरोप पुन्हा जोर धरत आहे.

अजित पवार गटातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते या परिस्थितीत निवडणुकीत कोणती भूमिका घेणार? हे आगामी काही दिवसांत स्पष्ट होणार आहे. तसेच जेथलिया यांच्या अचानक घेतलेल्या निर्णयाचा त्यांच्याच राजकीय भविष्यावर परिणाम होऊ शकतो का? हा प्रश्नही स्थानिक राजकीय वर्तुळात चर्चेत आला आहे. राजकीय जाणकारांचे मत असे की, अचानक केलेली ही आघाडी लोकांना रुचणार नाही; मतदार युतीला नाकारण्याची शक्यता जास्त.



# जिप मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांची टेंभुर्णी ग्रामपंचायतीस भेट



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत जिल्हा परिषद जालना यांच्या वतीने ग्रामीण विकास उपक्रमांची अंमलबजावणी प्रत्यक्ष पाहण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी, भोकरदन, राजूर, नळणी, बरंजळा यांसह अनेक गावांना भेट दिली.

या दौऱ्यादरम्यान सीईओ मिन्नू पी. एम. यांनी शाळा, अंगणवाडी केंद्रे, ग्रामपंचायत कार्यालये, सार्वजनिक ग्रंथालये आणि वाचनालयांची तपासणी केली. विविध गावांत राबविलेल्या उपक्रमांची माहिती घेऊन अधिकाऱ्यांना आवश्यक दिशानिर्देश दिले.

समृद्ध पंचायतराज अभियानातील प्रमुख उपक्रमांची पाहणी

सीईओ यांनी गावांमध्ये राबविल्या जाणाऱ्या सात प्रमुख घटकांचा आढावा घेतला. त्यामध्ये मुख्यतः: शालेय विद्यार्थ्यांमार्फत प्रभात फेरी, ग्रामपंचायत स्तरावरील सार्वजनिक ग्रंथालय व वाचनालय तपासणी, ग्रामस्वच्छता अभियान - कचरा, प्लास्टिक, पिशव्या संकलन, शाळा व अंगणवाड्यांमध्ये परसबाग उभारणी, अनिमिया तपासणी उपक्रम, आयुष्मान भारत कार्ड तातडीने काढून घेणे, गावामध्ये मशाल फेरी आयोजन

**टेंभुर्णी गावात उत्साहात मशाल रॅली**

टेंभुर्णी ग्रामपंचायतच्या पुढाकाराने गावातील बसस्टँडपर्यंत भव्य मशाल रॅली काढण्यात आली. स्वच्छता आणि आरोग्य जनजागृतीचा संदेश देत ग्रामस्थांनी यात उत्साहाने सहभाग नोंदवला. सीईओ मिन्नू पी. एम. यांनी स्वतः या रॅलीत सहभागी होत ग्रामस्थांचे कौतुक केले.

यावेळी सुमनबाई म्हस्के - सरपंच, टेंभुर्णी, जगदीश आढाव - ग्रामविकास अधिकारी जाधव साहेब - ग्रामपंचायत प्रशासन, सुपरवायझर रेखा धनवाई (सपकाळ), ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी सेविका, मदनीस, आशा कार्यकर्त्या, ग्रामस्थांच्या सक्रीय सहभागामुळे टेंभुर्णी ग्रामपंचायत परिसरात स्वच्छता, आरोग्य व शिक्षणविषयक उपक्रमांना नवे बळ प्राप्त झाले आहे.

# महान पंतप्रधान इंदिरा गांधी

भारताच्या सर्वात सामर्थ्यशाली पंतप्रधान इंदिरा गांधी यांची आज १०८ वि जयंती. इंदिरा गांधींची भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वात सामर्थ्यशाली आणि महत्वपुर्ण नेत्यांमध्ये गणना होते. १९ नोव्हेंबर १९१७ रोजी त्यांचा जन्म झाला. इंदिरा गांधी यांना इंदिरा हे नाव आजी आजोबांकडून मिळाले. पण लहानपणी सर्वजण त्यांना प्रियदर्शनी म्हणून बोलवायचे. आई कमला नेहरु आणि वडील पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडून त्यांना देशप्रेमाचे बाळकडू मिळाले. लहानपणीच त्यांच्यावर देशभक्तीचे संस्कार झाले. कारण त्यांचे पूर्ण कुटुंबच स्वातंत्र्य लढ्यात अग्रणी होते. लहानपणापासूनच स्वदेश आणि स्वदेशी याविषयी त्यांच्या मनात प्रेम निर्माण झाले. अगदी लहान असतानाच त्यांनी विदेशी खेळणी व कपड्यांची होळी केली होती. एका पाहुण्यांनी त्यांच्यासाठी विदेशातून आणलेला किंमती फ्रॉक परिधान करण्यास त्यांनी नकार दिला होता. आजोबा मोतीलाल नेहरू व वडील पंडित जवाहरलाल नेहरू यांचे देश स्वातंत्र्य करण्यासाठी चालू असलेले आंदोलने पाहून आपणही या आंदोलनात सहभागी व्हावे असे त्यांना वाटे. वयाच्या अवघ्या १३ वर्षी म्हणजे सण १९३० साली त्यांनी आपल्या सवंगड्यांसह वानरसेना नावाची संघटना स्थापन केली आणि नेत्यांचे संदेश पोहचवण्याचे काम केले. इंग्रजांविरुद्ध मिरवणुका काढल्या, घोषणा दिल्या. त्यांचे सुरवातीचे शिक्षण अलाहाबाद, पुणे इथे झाले पुढे त्या रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतन येथे शिक्षण घेण्यासाठी गेल्या. तिथे त्यांनी शिक्षणासोबत विविध कलाही आत्मसात केल्या. वडील पंडित जवाहरलाल नेहरू स्वातंत्र्याचा आंदोलनात अग्रणी असल्याने बऱ्याच वेळा ते तुरुंगातच असायचे अशा वेळी इंदिरा याच आई कमला नेहरू यांची काळजी घ्यायच्या. १८ फेब्रुवारी १९३६ रोजी कमला नेहरू यांचे निधन झाले तेंव्हा त्यांना खूप दुःख झाले. या दुःखातून सावरण्यासाठी वडील पंडित नेहरू यांनी त्यांना विदेशात शिकण्यासाठी पाठवले. विदेशातून शिक्षण पूर्ण करुन आल्यावर २६ फेब्रुवारी १९४२ रोजी फिरोज गांधी या उमद्या व देखण्या तरुणाशी त्यांनी विवाह केला. विवाहानंतर फिरोज गांधी व इंदिरा गांधी यांनी स्वातंत्र्याचा चळवळीत भाग घेतला. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर त्या संसारात रमल्या. राजीव आणि संजीव या दोन मुलांच्या पालनपोषणातच त्यांचा वेळ जाऊ लागला. पुढे त्या काँग्रेसमध्ये सक्रिय झाल्या. १९५९ साली त्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा बनल्या. यावेळी त्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी खूप काम केले. १९६० साली पती फिरोज गांधी तसेच १९६४ साली वडील पंडित नेहरू यांचे निधन झाले तरी त्या खचल्या नाहीत. कठीण परिस्थितीतही त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या. लाल बहाद्दूर शास्त्री यांनी त्यांना मंत्रिमंडळात माहिती प्रसारण आणि नभोवाणी खात्याच्या मंत्रीपदाची जबाबदारी दिली त्यांनी ती लीलया पेलली. लाल बहाद्दूर शास्त्रींच्या मृत्यूनंतर २४ जानेवारी १९६६ रोजी त्या देशाच्या पंतप्रधान बनल्या. त्या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या. त्यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली पण त्यावेळी देशाची परिस्थिती खूप बिकट होती. भारत पाकिस्तानचे युद्ध झाले होते. देशात मोठा दुष्काळ पडला होता. अन्नविषयक मदतीचा पी एल ४८० कराराचे नूतनीकरण करण्यास अमेरिकेने नकार दिला होता. या आर्थिक परिस्थितीतुन मार्ग काढत असतानाच १९६७ सलची निवडणूक आली अनेक राज्यात काँग्रेसला पराभव स्वीकारावा लागला. लोकसभेत काँग्रेसचे संख्याबळ घटले. त्यामुळे पक्षातील सिंडिकेट नेत्यांनी उचल खाल्ली. पंतप्रधान इंदिरा गांधींनी आपल्या इच्छेप्रमाणे कारभार करावा असे त्यांना वाटत होते. त्यामुळे इंदिरा गांधी आणि त्यांच्यात वाद होऊ लागले त्यातूनच काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. जेष्ठांची सिंडिकेट विरुद्ध तरुणांची इंडिकेट असा उभा संघर्ष झाला. काँग्रेसमधील तरुण नेत्यांनी इंदिरा गांधी यांना साथ दिली. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत इंदिरा गांधी यांनी सिंडिकेटचे उमेदवार नीलम संजीव रेड्डी यांचा पराभव करुन व्ही व्ही गिरी यांना राष्ट्रपती बनवले. सिंडिकेटचा दारुण पराभव झाल्याने इंदिरा गांधी सामर्थ्यवान बनल्या. मंत्रिमंडळात त्यांनी बदल केले. उपपंतप्रधान मोरारजी देसाई यांच्याकडील अर्थखाते त्यांनी स्वतःकडे घेऊन मोरारजी देसाई यांना बाहेरचा रस्ता दाखवला. त्यानंतर त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेतले. १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे, संस्थांनीकांचे तनखे रद्द करणे असे निर्णय घेऊन त्यांनी खळबळ उडवून टाकली त्यांच्या या धाडसी निर्णयाला अनेकांनी विरोध केला पण आपल्या निर्णयापासून त्या तसूभरही मागे हटल्या नाही. १९७१ साली झालेल्या मुदतपूर्व निवडणुका त्यांनी एकहाती जिंकल्या. या निवडणुकीत त्यांनी गरिबी हटाव ही घोषणा दिली. त्यांची ही घोषणा खुप गाजली. गोरगरिबांनी त्यांना भरभरुन मते दिली. याचवेळी पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान यांच्यात मोठा संघर्ष सुरू झाला. पूर्व पाकिस्तानातून एक कोटी निर्वासित भारतात आले. त्यामुळे अर्थव्यवस्थेवर ताण पडला. पूर्व पाकिस्तानला भारत मदत करीत आहे म्हणून पश्चिम पाकिस्तानने भारताविरुद्ध युद्ध पुकारले. अमेरिकेने भारताला धमकी देत त्यांचे सातवे आरमार बंगालच्या उपसागरात पाठवले पण त्या घाबरल्या नाहीत त्यांनी जनतेला आणि सैनिकांना विश्वास दिला या विश्वासाच्या जोरावरच भारताने पाकिस्तानचा दारुण पराभव केला आणि बांगलादेश नावाचे नवे राष्ट्र उदयास आणले. पाकिस्तानचे एक कोटी सैनिक भारताला शरण आले. यावेळी त्यांनी दाखवलेल्या धाडसाची आणि नेतृत्वगुणाची जगाने दखल घेतली. जागतिक राजकारणातील एक सामर्थ्यशाली नेत्या म्हणून त्या उदयास आल्या. देशातही त्यांची लोकप्रियता शिखरास पोहचली. विरोधी पक्षनेते अटल बिहारी वाजपेयी यांनी त्यांना दुर्गेची उपमा दिली. १९७५ साली त्यांनी सिक्कीमचे भारतात विलीनीकरण केले तर १९७६ साली अणुस्फोट करुन देशाला अणुऊर्जेत स्वयंपूर्ण बनवले. २६ जून १९७५ रोजी त्यांनी देशावर लादलेली आणीबाणी मात्र लोकांना रुचली नाही त्यामुळे १९७७ साली झालेल्या निवडणुकीत त्यांना पराभव स्वीकारावा लागला पण तीन वर्षाने १९८० साली त्या बहुमताने विजयी झाल्या. १९८४ साली पंजाबमधील पवित्र सुवर्ण मंदिरात खलिस्तानवादी अतिरेकी ठाण मांडून बसले होते. देशाची दुसरी फाळणी करुन स्वतंत्र खलिस्तान देश निर्माण करणे ही त्यांची मागणी होती त्यांचा जर लवकर बिमोड केला नाही तर देशाच्या सार्वभौमत्व आणि अखंडतेला मोठा धोका आहे हे ओळखून या अतिरेक्यांना सुवर्ण मंदिरातून हुसकावून लावण्यासाठी ऑपरेशन ब्ल्यू स्टार मोहीम राबविण्याचा निर्णय त्यांनी घेतला. हा निर्णय घेऊ नये असा सल्ला त्यांना अनेकांनी दिला. या मोहिमेमुळे अतिरेकी त्यांचा जीव घेण्यासही मागे पुढे पाहणार नाहीत असा सल्ला त्यांना अनेकांनी दिला पण देशाच्या अखंडतेसाठी त्यांनी हा निर्णय घेतला. सुवर्ण मंदिरात ऑपरेशन ब्ल्यू स्टार मोहीम राबवून अतिरेक्यांना बाहेर काढण्यात आले. अनेक अतिरेक्यांचा खात्मा करण्यात आला. भिंद्रनवाले हा अतिरेकी या कारवाईत मारला गेला. या मोहिमेने दुखावलेल्या त्यांच्या अंग रक्षकानींच ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांच्यावर गोळीबार केला त्यात त्यांचा दुःखद अंत झाला. त्यांच्या मृत्यूने भारतातच नव्हे जगात शोककळा पसरली. देशाच्या सार्वभौमत्व आणि अखंडतेसाठी हौतात्म्य पत्करणाऱ्या इंदिरा गांधी यांना जयंतीदिनी भावपूर्ण आदरांजली!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## विद्यार्थांमध्ये रमल्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल; राजेगाव शाळेतील विद्यार्थांचा घेतला वर्ग



**जालना । प्रतिनिधी -** सदस्थितीत जिल्हात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची अंमलबजावणी सुरू असून यातंर्गत आज दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी घनसावंगी तालुक्यातील राजेगाव शाळेस भेट देवून विद्यार्थांशी संवाद साधला व मुलांचा अभ्यास देखील घेतला.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजेगाव येथील परिसराची जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी पाहणी केली व नंतर त्यांनी आठवीच्या वर्गात जाऊन मुलांना स्वतः गणित विषयाची उदाहरणे दिली व सोडविण्यासाठी सांगितले. मुलांनी जिल्हाधिकारी यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. मुलांची गुणवत्ता बघून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सर्व मुलांचे व शाळेचे कौतुक केले.

यावेळी त्यांनी राजेगाव येथील ग्राम पंचायत, मंदिर तसेच गावाची पाहणी केली. यावेळी उप जिल्हाधिकारी सामान्य प्रशासन श्रीमती नम्रता चाटे, उपविभागीय अधिकारी अंबड उमाकांत पारधी, तहसीलदार घनसावंगी वंजारी मॅडम नायब तहसीलदार इथापे, ग्रामसेवक धर्मा लहामगे, यांच्यासह राजेगाव येथील गजानन उगले नवनाथ उगले, श्रीधन कोरडे,विठ्ठल उगले,वसंत कोरडे,भरत कोरडे तुकाराम सपाटे,राजेंद्र थोरात, गुलाबराव सपाटे,आसाराम कोरडे,राजेंद्र उगले,भरत कोरडे, परमेश्वर टरले,भागवत उगले,नवनाथ सपाटे,किसन सपाटे शालेय समिती राजेगाव व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजेगाव येथील कल्याण वाघमारे, कैलास आरगडे, अमोल धांडगे, कसबे सर,श्रीमती घुले ,श्रीमती शेळके , पोषण आहार मदतनीस उगले,छाया देवडे, यांची उपस्थिती होती.

## पदवीधर मतदारसंघासाठी सुधारित कार्यक्रम जाहीर

**जालना । प्रतिनिधी -** उपसिचव व सह मुख्य निवडणूक अधिकारी यांनी पदवीधर मतदार संघाच्या मतदार नोंदणीसाठी नमुना क्र.१८ च्या अर्जावर कार्यवाही करण्यासाठी तारीख वाढवून देण्यात आली असून सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानूसार हस्तलिखिते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई दि.२८ नोव्हेंबर २०२५, प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी दि.३ डिसेंबर २०२५, दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी दि.३ ते १८ डिसेंबर २०२५ राहील. दावे व हरकती निकाली काढण्याचा दिनांक व पुरवणी यादी तयार व छपाई दि.५ जानेवारी २०२६ रोजी करण्यात येईल. तसेच यादीची अंतिम प्रसिध्दी १२ जानेवारी २०२६ रोजी करण्यात येईल. अशी माहिती प्र.उप जिल्हा निवडणूक अधिकारी सुकेशिनी कांबळे-पगारे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : अ‍ॅड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com




शहर वाहतूक जालना व उप प्रादेशिक परिवहन विभाग आरटीओ जालना यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार (दि १८) रोजी एकूण ४८ रिक्षांविरुद्ध कारवाई करण्यात आली व तीन लाख पंधरा हजार सातशे पन्नास रुपयाची ईचलन द्वारे दंडात्मक कारवाई करण्यात आली. (छायाचित्र किरण खानापुरे)

# टेंभुर्णीतील महात्मा फुले सार्वजनिक ग्रंथालयास मुख्यमंत्री पंचायत राज समृद्ध अभियान निमित्ताने टीमची भेट



**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील महात्मा ज्योतीराव फुले सार्वजनिक वाचनालयास मंगळवार दिनांक १८/११/२०२५ ला मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंतर्गत जालना जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी श्रीमती पी एम मित्रू ह्या जाफाबाद तालुक्यातील दौऱ्यावर आहे म्हणून ग्रामपंचायत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गावातील सार्वजनिक ग्रंथालयास भेट देणार असल्याने सगळे सज्ज होते.

यावेळी शालेय विद्यार्थी ची रॅली काढून ग्राम स्वच्छता अभियान राबविणे शाळा अंगणवाडी मध्ये परस बागेचे उभारणी करणे कुष्ठरोग तपासणी कार्यक्रम राबविणे अविष्मान भारत कार्ड जनजागृती करणे गावामध्ये मशाल फेरीचे आयोजन करणे गावातील सार्वजनिक ग्रंथालयास भेट देऊन समस्या जाणून घेण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत आहे यावेळी टेंभुर्णी चे सरपंच सौ सुमनताई म्हस्के ग्रामपंचायत अधिकारी जगदीश आढाव गौतम म्हस्के संतोष पाचे भिकनखाँ पठाण बि डी सवडे ग्रंथालय ग्रंथपाल अनिकेत अंभोरे सोहम गुजरकर महात्मा ज्योतीराव फुले सार्वजनिक वाचनालय चे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब पाटील अंभोरे ग्रामपंचायत सदस्य वाचक वर्ग उपस्थित होता यावेळी जाफाबाद पंचायत समितीचे बाधकाम विभागाचे शाखा अभियंता हेमराज वाघ कनिष्ठ अभियंता तुप्ती शंभरकर कनिष्ठ अभियंता पुजा आभाळे...यांनी भेट दिली महात्मा ज्योतीराव फुले सार्वजनिक वाचनालय टेंभुर्णी ता जाफाबाद जिल्हा जालना येथील ग्रंथ संपदा साहित्य स्पर्धा परीक्षा अभ्यासाठी उपयुक्त पुस्तके के सागर लिखित संपूर्ण संच ग्रामीण भागातील सार्वजनिक ग्रंथालय मध्ये उपलब्ध असल्याने समाधान व्यक्त केले यावेळी वाचकांनी सुध्दा जिल्हा परिषद च्या टीमला ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वाचन संस्कृती टिकविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळेच्या विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून सर्व शाळांना आदेशीत करून सार्वजनिक ग्रंथालय चे सभासद व्हावे म्हणून सुचना दिल्यास बौद्धिक क्षमता वाढेल अशा अपेक्षा अधिकार्यांना कडे व्यक्त करण्यात आल्या

# नगर परिषद निवडणुकीनिमित्त जिल्हाधिकारी यांची अंबड येथे भेट

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी नगर परिषद निवडणुकच्या अनुषंगाने भेट दिली व निवडणूक प्रक्रियेविषयी आढावा घेतला. नगर परिषद कार्यालय अंबड येथे नगर परिषद निवडणुकीसाठी प्राप्त अर्जांची आज रोजी छाननी सुरू होती. जिल्हाधिकारी यांनी या सर्व प्रक्रियेची पाहणी केली.

यावेळी उप विभागीय अधिकारी अंबड उमाकांत पारधी, तहसीलदार अंबड विजय चव्हाण यांच्या सह अन्य निवडणूक विषयक अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी त्यांनी उपस्थित सर्व अधिकाऱ्यांना अधिकाऱ्यांना निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी आवश्यक सर्व उपाययोजना प्रभावीपणे राबवण्याच्या सूचना दिल्या. निवडणूक प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी उभारण्यात आलेले विविध कक्षांची त्यांनी पाहणी केली व नोडल अधिकारी यांना निवडणूक विषयक कामकाज चोखपणे पार पाडण्याबाबत निर्देश दिले.

जिल्हाधिकारी मित्तल यांनी निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्यावर विशेष भर दिला. उमेदवार तसेच पक्ष कार्यकर्त्यांनी नियमांचे पालन करावे आणि प्रशासनाने कोणत्याही तक्रारींची तात्काळ दखल घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.या भेटीदरम्यान मतमोजणी कक्षाची व सुरक्षा कक्षाची पाहणी केली व मतदान केंद्रांची मूलभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था, कर्मचारी नियोजन, साहित्य उपलब्धता, संवेदनशील व अतिसंवेदनशील केंद्रांची स्थिती आदींचा जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेतला. तसेच निवडणूक कालावधीत आचार संहितेचे उल्लंघन होणार नाही याची खबरदारी सर्वांनी घ्यावी हे निर्देश त्यांनी दिले.

# विवेकानंद इंग्लिश स्कूल क्रिकेट टीमची विभागीय स्पर्धेसाठी निवड



**परतूर । प्रतिनिधी -** क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परीषद जालना आयोजित जिल्हा स्तरीय क्रिकेट स्पर्धे मध्ये विवेकानंद इंग्लिश स्कूल चे यश या स्पर्धेत स्कूल च्या अंडर १४ मुलांच्या संघाने मारली बाजी टीमची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या प्रसंगी शाळेचे अध्यक्ष,डॉ.बाहेकर शालेय समितीचे अध्यक्ष, संदिप दादा बाहेकर. श्रीमती वर्षा शिंदे. विवेकानंद इंग्लिश स्कूल चे मुख्याध्यापक, संतोष चाको. विवेकानंद पब्लिक स्कूल चे मुख्याध्यापक,विजय दंदाले. महाजन,तसेच संजय गाढवे. ( जिल्हा क्रीडा अधिकारी जालना ) श्रीमती लता लोंढे ( तालुका क्रीडा अधिकारी)तालुका क्रीडा संयोजक,प्रमोद राठोड. सरफराज कायमखानी. आकाश गोरे. अनिकेत चिखले. मॅडम अलका आंभुरे.मॅडम आकात. तसेच सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

# जाफराबादच्या दौलतपुरा जिल्हा परिषद शाळेत स्कूल बॅग चे वाटप



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** जि. प. प्रा. शाळा, दौलतपुरा येथे गरजू विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व चॉकलेट वाटप चेअरमन दुर्गेश बनकर यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन दौलतपुरा, ता. जाफराबाद जि. प. प्राथमिक शाळा दौलतपुरा येथे युनायटेड ग्लोबल फेडरेशन तर्फे आज गरजू विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग आणि चॉकलेटचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची लहर उमटली.

या प्रसंगी फेडरेशनचे चेअरमन दुर्गेश बनकर यांनी विद्यार्थ्यांना मनापासून मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शिक्षण हीच खरी ताकद आहे. गावातील प्रत्येक मुलाने मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करत राहावं. तुम्ही मनापासून अभ्यास केला तर तुम्हीही मोठ्या पदावर पोहोचू शकता. कोणतेही स्वप्न लहान नसतं फक्त चिकाटी हवी अशी प्रेरणादायी शिकवण त्यांनी मुलांना दिली. त्यांच्या शब्दांनी उपस्थित विद्यार्थ्यांसह पालक आणि शिक्षकांच्या डोळ्यांत भावनांनी चमक निर्माण झाली.

या उपक्रमासाठी मॅनेजिंग डायरेक्टर ज्ञानेश्वर शास्त्री सुसर, उमेश गिराम, भागवत लोखंडे निमल रेस्क्यू प्रमुख वैभव लाखोले, राजेश खांडेभराड, कुलदीप नवले यांनी सहकार्य करत उपस्थिती दर्शवली. शाळेच्या शिक्षकवर्गातील सुभाष काळे, मुख्याध्याप गणेश पठाडे, कौतिकराव फोलाने ,प्रतिभा राजपूत, प्रज्ञा लोखंडे, संगीता वायाळ, छाया पुंगळे ,शीतल सांगळे यांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला आणि फेडरेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. मुलांना दिलेल्या साहित्यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला निश्चितच हातभार लागेल असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला.

# अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या महाराष्ट्र संघटकपदी विकासकुमार बागडी

**जालना । प्रतिनिधी -** पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढणारी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघच्या महाराष्ट्र संघटकपदी जालना येथील पत्रकार विकासकुमार बागडी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांची ही नियुक्ती अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मनोहर सुने यांच्या आदेशाने महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा राष्ट्रीय संघटक कैलास देशमुख यांनी एका नियुक्तीपत्रकाव्दारे केली आहे. आगामी काळात पत्रकारांची एकजुट करण्यासह त्यांच्या हितासाठी काम करणार असल्याची ग्वाही नुतन महाराष्ट्र संघटक विकासकुमार बागडी यांनी दिली आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष युसूफखान पठाण, केंद्रीय नियोजन समिती अध्यक्ष सुरेश सवळे, राष्ट्रीय उपाध्यक्ष राजेंद्र भुरे, राष्ट्रीय महासचिव अशोक पवार, महाराष्ट्र प्रदेश महिला मंच सरचिटणीस कांचनताई मुरके आदिंनी अभिनंदन केले आहे.

# COMPREHENSIVE,
# ENHANCED,COURT-GRADE
# PUBLIC LEGAL NOTICE

*(For Newspaper Publication — Under Multiple Statutory Provisions)*

**Issued under Section 80 of the Code of Civil Procedure, 1908; Read with Sections 17 & 18(e) of the Registration Act, 1908; Section 52 of the Transfer of Property Act, 1882 (Doctrine of Lis Pendens). The Trade Unions Act, 1926; The Indian Trusts Act, 1882; The Trade Marks Act, 1999; The Copyright Act, 1957; and all other enabling statutory and constitutional provisions.**

1. Name of the Issuing Organisation : **PRESS COUNCIL OF MAHARASHTRA**
A duly registered, autonomous, independent, self-governing, non-political, and service-oriented public institution, functioning under multiple statutory registrations, and operating in accordance with its constitution, bye-laws, and governing provisions. The institution exercises its functions with full administrative autonomy, maintains complete financial and functional independence, and undertakes its public-interest activities in conformity with applicable legal, regulatory, and ethical standards.
2. Registered Office Address : **BADNAPUR, TQ. BADANAPUR, DIST. JALNA**
House No. 1885/1, Near Badnapur Police Station, Aurangabad–Jalna Highway Road, Naya Mohalla, Badnapur, Taluka Badnapur, District Jalna – 431202, Maharashtra (India).
3. Authorised Signatory : **Adv. ILIYAS ABDULMAJEED KHAN**
Settlor & General Secretary, as well as Former Chairman, Press Council of Maharashtra.
4. Purpose & Legal Basis ofThis Notice : **This Public Legal Notice is issued for the following statutory, constitutional and procedural purposes:**

(a) **As a mandatory statutory pre-suit notice under Section 80 of the Civil Procedure Code, 1908**
- Section 80 CPC requires that before initiating any suit against the State, Government Departments, Public Officers or Authorities, a two-month prior legal notice is compulsory.
- Such notice must disclose the cause of action, nature of claim, relief sought and the basis of legal injury.
- Issuance of this notice ensures that:
  - The Government gets a reasonable opportunity to reconsider the matter;
  - Any administrative resolution can occur before litigation;
  - The institution's legal rights remain protected pending the statutory period.
- This notice thereby operates as a statutory condition precedent for maintainability of the suit.

(b) **For voluntary legal registration under Sections 17 & 18(e) of the Registration Act, 1908**
- Section 17 mandates compulsory registration of documents relating to rights in immovable property, institutional status, and other legally significant instruments.
- Section 18(e) permits voluntary registration of any declaration, notice, or document that creates permanent legal evidence or affects institutional interests.
- Registration of this notice ensures:
  - Creation of a legally recognised and permanently preserved public record;
  - Protection against future denial, dispute, suppression or misrepresentation of facts;
  - Evidentiary value under the Evidence Act as a public document (Section 74).

(c) **To formally invoke the Doctrine of Lis Pendens (Section 52, Transfer of Property Act, 1882)**
- Once legal proceedings are contemplated or initiated, Section 52 prohibits any authority or individual from:
  - Altering the legal status,
  - Interfering with the institutional rights,
  - Taking any action prejudicial to the pending proceedings.
- Issuing this public notice therefore:
  - Notifies all authorities of impending or ongoing litigation;
  - Prevents third parties from claiming ignorance;
  - Legally restrains all governmental or non-governmental bodies from disturbing the organization's legal rights, identity, property, or institutional character.

(d) **For creation of an official permanent public record and constructive notice to all authorities and the public at large:**
- A public notice published in print and digital domains constitutes constructive notice—legally binding even on persons who have not actually read it.
- Such constructive notice prevents future claims of bona fide ignorance.
- This notice serves as:
  - A formal declaration of institutional rights,
  - A permanent documentary record for all future legal reference,
  - A safeguard against any administrative or private interference.

(e) **For statutory protection of the registered name, seal, emblem, institutional identity, intellectual property, logo/device mark and official records**
- The notice asserts the organization's rights derived from:
  - Registration Act, 1908
  - Copyright Act, 1957.
  - Trademark Act, 1999.
  - Indian Trusts Act, 1882.
  - Trade Unions Act, 1926 /Institutional registration laws,
  - Constitutional protections (Articles 19, 21).

(e) **To secure institutional autonomy and protect administrative independence:**
This notice declares that no authority may interfere with the internal functioning, decision-making or constitutional autonomy of the institution except in accordance with law.

(g) **To prevent future adverse claims or encroachments upon institutional rights:**
This public declaration bars all present and future claims that contradict the institution's registered status, intellectual property, or administrative capacity.

(h) **To establish evidentiary presumption under the Indian Evidence Act;**
Once published, this notice becomes a public document, admissible as evidence under:
- Section 74 (public documents),
- Section 81 (presumption of genuineness of gazettes/public notices),
- Section 114 (judicial presumptions).

5. **Respondents (in their official capacity):This Notice is deemed served upon the following:**
1) The Secretary, Ministry of Information & Broadcasting, Govt. of India.
2) The Chief Secretary, Government of Maharashtra.
3) The Principal Secretary, Directorate General of Information & Public Relations (DGIPR)
4) The Deputy Secretary, General Administration Department (Desk-34)
5) The Director (Information & Public Relations), Directorate General of Information & Public Relations
6) The Deputy Secretary, Industries, Energy, Labour & Mining
7) Mr. Kishor Ramesh Gangurde, Director (Information)
8) The Deputy Registrar (Trade Unions Act, 1926), Office of Deputy Labour Commissioner
9) The Secretary, Press Council of India, New Delhi

(All are served strictly in their official administrative capacity)

6. **Legal and Administrative Declaration:**
Notice is hereby issued to all Ministries, Departments, statutory authorities and members of the public as follows:

A. **Protection of Legal Identity;** Registration and Institutional Records. The following enjoy full statutory protection under applicable law:
- Registered institutional name "Press Council of Maharashtra"
- Official seal, emblem, logo, device-mark
- Trade Union registration (1926 Act)
- Trust/NGO registration
- RNI-registered periodicals
- ISBN publications
- Copyrighted materials
- All internal resolutions, records and documents

No authority may alter, suspend, cancel, question or interfere with the above without due judicial process.

B. **Prohibition on Unauthorized Administrative Interference;**
**(No Ministry, Department, Authority or Officer shall)**
- Initiate any inquiry or probe
- Alter any record
- Issue any adverse administrative direction
- Cancel or modify registration
- Demand documents without jurisdiction
- Act on complaints, influence or pressure
- Communicate adverse remarks
- Issue illegal letters threatening action
- Impose restrictions or prohibitions — during the Lis Pendens period and Section 80 CPC notice period.

All such actions shall be void, ultra vires, non est, inoperative and without jurisdiction.

C. **Doctrine of Lis Pendens — Binding Effect;**
Under Section 52 TPA, once a potential legal dispute is formally notified:
- No authority may take any step that affects the legal identity or rights of the institution.
- Any such step, if taken, carries no legal effect.
- All parties are prohibited from altering legal status, records or rights until the final adjudication.

D. **Additional Constitutional and Statutory Protections;**
(1) **Article 19(1)(a) & 19(1)(c) — Fundamental Rights;**
The institution enjoys constitutional protection for freedom of speech/press and freedom of association.
Any interference constitutes a violation of Part III of the Constitution.
(2) **Articles 14 & 21 — Due Process of Law;**
Arbitrary administrative action is unconstitutional.
The State must act fairly, reasonably, and within jurisdiction.
(3) **Administrative Law Principles;**
Authorities must comply with:
- Natural justice
- Nemo judex in causa sua
- Audi alteram partem
- Wednesbury reasonableness
- Doctrine of legitimate expectation.

Violation makes the action illegal.
(4) **Section 79–80 CPC**
All government departments are statutorily bound to respond lawfully and avoid illegal actions.

7. **Legal Consequences for Violators;**
(1) **Criminal Liability; Any officer acting without jurisdiction will be liable under:**
- Section 198 BNS – Public servant disobeying law
- Section 201 BNS – Framing incorrect document
- Section 217 BNS – Giving false information with intent to make a public servant misuse legal power to harm someone.
- Section 227 BNS – Giving false evidence.
- Section 228 BNS – Fabricatingfalse evidence.
- Section 248 BNS – False charge of offence made with intent to injure.
- Section 257 BNS – Public servant in judicial proceeding corruptly making report, etc., contrary to law.
- Section 61 (B) BNS – Punishment of criminal conspiracy.
- Section 351 (1) BNS – Criminal intimidation.
- Section 356 (1), (2), (3) & Section 356 (4) – Defamation (if applicable)

(2) **Civil and Tortious LiabilityOfficers may face:**
- Suit for damages
- Compensation for loss caused
- Exemplary/punitive costs
- Misfeasance, nonfeasance & malfeasance liability

(3) **Contempt of Court–Any violation during the Lis Pendens period constitutes wilful contempt of court.**
(4) **IPR ConsequencesUnauthorized use of:**
- Trade name • Logo • Trademark • Copyright • Publications

**Will invite:**
- Suit for injunction • Delivery-up/destruction • Criminal complaint
- Heavy damages and costs.

8. **Public Warning and Advisory;**
(1) The institution is validly registered under multiple statutes.
(2) Any false or malicious complaint will attract legal action.
(3) No administrative act taken after this notice shall hold legal force during the pendency of Lis Pendens.
(4) All communication concerning the institution must be lawful, written, reasoned and jurisdictionally valid.
(5) Public reliance on forged, false, misleading or unauthorized documents shall invite prosecution.
(6) Any attempt to interfere with statutory rights shall result in immediate litigation.

9. **Authentication;**
This Notice is published bona-fide for statutory compliance and legal protection of the institution.

Date of Publication: **11 November 2025.**
Place of Published: **JALNA / MUMBAI.**

**Issued by Order and Authority of:**
**PRESS COUNCIL OF MAHARASHTRA**
**(With Signature, Seal and Authorization)**

Sd/-
Notice Issued and Signed by:
**(Adv. Iliyas Abdulmajeed Khan)**
Settlor & General Secretary,
as well as Former Chairman
**Press Council of Maharashtra**